# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

### मा. न्यायाधीश एस.आर.जगताप यांची महाविद्यालयास सदिच्छा भेट

लोकमत पुणे, गुरुवार, दि. २० ऑगस्ट २०१५ २

## हुतात्मा विद्यालयाला न्यायाधीशांची सदिच्छा भेट

राजगुरुनगर : येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एस. आर. जगताप यांनी हुतात्मा राजगुरु महाविद्यालयास सदिच्छा भेट देऊन संस्था व महाविद्यालयाने राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती घेतली.

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून ते येथे आले होते. न्यायाधीश जगताप यांचे स्वागत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी केले. त्यांना संस्थेची ध्येयधोरणे, संस्थेची वाटचाल याबद्दलची माहिती दिली. याप्रसंगी न्यायाधीश दाभाडे, न्यायाधीश साबळे, संस्था संचालक ॲड. मुकुंद आवटे, ज्ञानेश्वर करंडे, खेड तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. बाळासाहेब लिंभोरे, उपाध्यक्ष ॲड. संदीप घेनंद, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. बी. शिंदे, ॲड. रामचंद्र घोलप, ॲड. पोपटराव तांबे आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते. संस्था संचालक ॲड. मुकुंद आवटे यांनी आभार मानले.

◆ न्यायाधीश जगताप यांनी विद्यार्थी अभ्यासिका, ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा, जिमखाना, मुलींचे वसतिगृह, राष्ट्रीय सेवा योजना, स्पर्धा परीक्षा, बीसीए व बीसीएस संगणक प्रयोगशाळा, गंध कस्तुरीचा भित्तीपत्रक, हुतात्मा स्मारक या विभागांना भेटी दिल्या. साहेबरावजी बुट्टे-पाटील स्मृती व्याख्यानमालेबरोबरच संस्था व महाविद्यालयाने राबविलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले आणि संस्थेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.



राजगुरुनगर येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एस. आर. जगताप यांनी हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाला सदिच्छा भेट दिली.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख